नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३५६ | Issue - 356 | वार मंगळवार दि. १९ मे २०२६ | Blow- Tuesday Date 19 May 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# नीट पेपरफुटीप्रकरणात शिवराज मोटेगावकरला सीबीआय कोठडी

## सीबीआयकडून कारवाईचा धडाका; मोटेगावकर याला मिळाली ९ दिवसाची कोठडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशभरात खळबळ उडवून देणार्या नीट पेपरफुटीप्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रात सापडले असून सीबीआयने कारवाईचा धडका लावला आहे. पेपर फुटीचे लातूर कनेक्शन समोर आले लातूरमधील प्रसिद्ध आरसीसी कोचिंग क्लासेसच्या शिवराज मोटेगावकरला सीबीआयने अटक केली आहे. तत्पूर्वी सीबीआयने मोटेगावरची ट्रान्झिट रिमांड घेतली होती, २ दिवसांच्या ट्रान्झिट रिमांडमधील प्राथमिक चौकशीत शिवराज मोटेगावकरकडे महत्त्वाचे पुरावे हाती लागल्यानंतर सीबीआयने मोटेगावरकरला अटक करुन आज त्याला सीबीआयच्या कोर्टात हजर केले होते. त्यावेळी, सीबीआय कोर्टाने आरोपीला ९ दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे.

सीबीआयने शिवराज मोटेगावकरला अटक केल्यानंतर आज न्यायालयात हजर करण्यात आले. तत्पूर्वी, ट्रान्झिट रिमांडमध्ये सीबीआयला मोटेगावकरकडून महत्वाची माहिती मिळाली, काही पुरावेही मिळाले, त्यातूनच त्याला अटक करण्यात आली. त्यानुसार, शिवराज मोटेगावकरने २३ एप्रिल रोजी केमिस्ट्रीचा पेपर मिळवला होता, त्याच्या मोबाईलमध्येच लिकड प्रश्नपत्रिका सीबीआयला आढळून आली. तसेच, शिवराज मोटेगावकर हा सेवानिवृत्त प्राध्यापक प्रल्हाद कुलकर्णीसोबत पेपरफुटीत सहभागी होता, हेही निदर्शनास आले.

सीबीआयकोर्टातन्यायाधीशांनी तपास अधिकाऱ्यांना एक प्रश्न विचारला, मोटेगावकरकडे प्रश्नपत्रिका आहेत हे तुम्हाला कसं कळलं? त्यावर, निवृत्त प्राध्यापक कुलकर्णी हा शिवराजसोबत संपर्कात होता, त्याद्वारे ही बाब समोर आली आहे. येथील कोचिंग सेंटरमार्फतच प्रश्नपत्रिकांचे वितरण सुरू होते, अशी माहिती तपास अधिकारी पवन कौशिक यांनी न्यायालयात दिली. त्यानंतर, सीबीआयने आरोपीसाठी १० दिवसांची सीबीआय कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाने ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली. त्यामुळे, पुढील ९ दिवस आता शिवराज मोटेगावकरचा मुक्काम सीबीआय कोठडीत असणार आहे.



दरम्यान, तुम्हाला काही पश्चाताप आहे का? असा प्रश्न शिवराज मोटेगावकरला पत्रकारांनी विचारला असता, त्याने पत्रकाराकडे रागाने बघितलं.

संभाजीनगरच्या शाखेला २ जूनपर्यंत सुट्टी

दरम्यान, शिवराज मोटेगावकरला अटक केल्यानंतर आरसीसीच्या संभाजीनगरच्या शाखेतील क्लास बंद केल्याची चर्चा होती. मात्र, आजपासून ते २ जूनपर्यंत आधीच सुट्ट्या देण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच उन्हाळी सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र, आज मोटेगावकर यांना अटक केल्यानंतर क्लास बंद पडल्याच्या अफवा पसरल्या आहेत. पण, प्रत्यक्षात माहिती घेतली असता अगोदरच सुट्ट्या जाहीर झाल्याचं सांगण्यात आलं.

पेपरफुटीचे पुणे महापालिकेत पडसाद

नीट परीक्षा पेपरफुटीचे पडसाद पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेतही पाहायला मिळाले. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत काँग्रेसकडून आंदोलन करण्यात आले. पुण्यातील मॉर्डन कॉलेजच्या पदाधिकारी आणि शिक्षकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. नीट परीक्षा घोटाळ्यामध्ये मॉर्डन कॉलेजच्या शिक्षकाचा सहभाग असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. मॉडेल कॉलेजच्या प्राचार्य निवेदिता एकबोटे या भाजपच्या नगरसेविका आहेत, त्यांच्यासमोरच काँग्रेसने आंदोलन केले. त्यांच्यावर देखील कारवाई करावी अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

सरस्वतीच्या मंदिरात कळेना चोर कुठले, साव कुठले

लक्ष्मीच्या दर्शनानेच परीक्षेचे पेपर फुटले... असे गाणेही यावेळी काँग्रेस सदस्यांनी गायले.

# वऱ्हाडाच्या ट्रकचा पालघरमध्ये भीषण अपघात, १२ जणांचा मृत्यू तर २५ जण गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पालघर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वऱ्हाडाच्या ट्रकचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. वऱ्हाडाची ट्रक आणि कंटेनरमध्ये हा भीषण अपघात झाला. यामध्ये १२ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तर २० ते २५ जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, मृत्यूच आकडा वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे.



मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वऱ्हाडाच्या ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. पालघरच्या धानीवरी येथे वऱ्हाडाची ट्रक आणि कंटेनर मध्ये हा भीषण अपघात झाला. वऱ्हाडाच्या ट्रक मध्ये १०० पेक्षा जास्त वऱ्हाडी असल्याची माहिती मिळत आहे. आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. वीस ते पंचवीस जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर कासा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, एकाच वेळी तब्बल १२ जणांचा मृत्यू झाल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे.

हिंगोली जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. वसमत तालुक्यात येणाऱ्या फाटा गावाच्या शिवारात कालव्यामध्ये ट्रॅक्टर कोसळले आहे. या अपघातामध्ये २० वर्षीय तरुणाचा ट्रॅक्टर खाली दबून जागीच मृत्यू झाला आहे. ज्ञानेश्वर कदम हा वीस वर्षीय तरुण पहाटे साडेचार वाजता च्या सुमारास ट्रॉलीसह ट्रॅक्टर घेऊन शेताकडे जात असताना रस्त्याचा अंदाज आला नाही आणि ट्रॅक्टर वरील नियंत्रण सुटले यामुळे रस्त्याचा बाजूला असलेल्या कालव्यामध्ये ट्रॅक्टर ट्रॉलीसह कोसळले आणि याच ट्रॅक्टर खाली दबून न्यानेश्वर कदम यांचा मृत्यू झाला आहे.

बीडच्या नागापूर - टोकवाडी रस्त्यावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या भीषण अपघातात एका मोटरसायकलस्वराचा जागीच मृत्यू झाला आहे. संतोष गणपत गुट्टे वय ४४, असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते आरोग्य विभागात कर्मचारी म्हणून कार्यरत होते. या घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

नागापूर येथे काम आटोपून मोटरसायकलवरुन थर्मल कॉलनीकडे परत येत असताना नागापूर - टोकवाडी रस्त्यावर अज्ञात वाहनाने त्यांच्या मोटरसायकलला जोरात धडक दिली. या धडकेत ते रस्त्यावर कोसळून गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांना तातडीने परळी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता त्यांना मृत घोषित केले. याच नागापूर टोकवाडी या मार्गावर बेकायदेशीर वीटभट्ट्यांच्या अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद झाला असून त्यातच रस्त्याला ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळं अपघाताचे प्रमाण वाढले असून याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



# राज्यात पेट्रोल, डिझेल, एलपीजी टंचाई नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पश्चिम आशियातील तणावामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे होणाऱ्या जलवाहतुकीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. मात्र भारत सरकारने अडचणींतून मार्ग काढला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध देशांशी संवाद सुरू ठेवून भारताने देशातला इंधन, गॅस, सिलेंडर आदीचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांना यश मिळाले आहे.

यामुळेच महाराष्ट्रात पेट्रोल, डिझेल, पीएनजी, सीएनजी यांची टंचाई नाही. महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या तेल आणि ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रमुख कंपन्यांनी राज्यातील जनतेला ऊर्जास्रोतांबाबत निश्चिंत राहण्याची हमी दिली आहे. मे २०२६ च्या पहिल्या पंधरवड्यादरम्यान डिझेलच्या मागणीत १९.६६ टक्के तर, पेट्रोलच्या मागणीत २०.३९ टक्के इतकी वाढ झाल्याचे दिसून आले.

मे २०२६ च्या पहिल्या पंधरवड्यात महाराष्ट्रासाठी एकूण २६७ टीकेएल इतका पेट्रोलचा तर ५०२ टीकेएल इतका डिझेलचा पुरवठा करण्यात आला होता. राज्यभरात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने ग्राहकांनी घाबरून जात खरेदी करू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात सार्वजनिक क्षेत्रातील तिन्ही तेल विपणन कंपन्यांकडे मिळून अंदाजे ३२,९९५ एमटी इतका एलपीजीचा साठा उपलब्ध आहे. यासोबतच एलपीजीचा सुरळीत पुरवठा होत राहील याची सुनिश्चिती करण्यासाठी वितरकांकडील साठ्याचा नियमितपणे पुनर्भरणा केला जात आहे.

राज्यातील ग्राहकांसाठी पुरेसे एलपीजी सिलेंडर उपलब्ध आहेत. एलपीजी सिलेंडरसाठी ऑनलाईन पद्धतीने ऑर्डर नोंदवण्याची प्रक्रिया निश्चित केलेल्या नियमांनुसार सुरळीत सुरू आहे. शहरांतील ग्राहकांसाठी २५ दिवसांनी आणि ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी ४५ दिवसांनी ऑनलाईन ड्झ्ञ्ऋ सिलेंडर ऑर्डर करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्मशानभूमी आणि समाज सेवी संस्था यांसारख्या प्राधान्य क्षेत्रांना ड्झ्ञ्ऋ चा प्राधान्याने व्यवस्थित पुरवठा होत आहे. स्थलांतरित मजुरांना पाच किलोचे सिलेंडर पुरवले जात आहेत.

पाईपद्वारे गॅसचा पुरवठा करण्यासाठी नव्या जोडण्या देण्याचे काम वेगाने सुरू आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक ४४ लाख झ्छ्ऋ जोडण्या आहेत. जागतिक उर्जा संकट लक्षात घेऊन, राज्यात पीएनजीच्या जाळ्याचा विस्तार करण्याचे काम सुरू आहे.

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक; डिझेल दरवाढीमुळे एसटी महामंडळावर वार्षिक

# इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ करण्यात येणार नसल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून, मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. त्यामुळे प्रति लिटर ३ रुपये १० पैशांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत असून, मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी रुपये, तर वार्षिक स्तरावर सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून, एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते.

तथापि, कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नसून, केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

### १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार


एसटीने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी शासन विविध पर्यायांचा विचार करीत असून, इंधन बचत, ई-बसचा वाढता वापर, खर्च नियंत्रण तसेच महसूलवाढीच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा असून, सेवा अबाधित राखत आर्थिक संतुलन कायम ठेवणे हे महामंडळासमोरील प्रमुख आव्हान असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# कोंडी येथे भीषण अपघात; तिघांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील कोंडी इथं धक्कादायक घटना घडली. स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी पुण्याहून अक्कलकोटला निघालेल्या कुटुंबावर काळानं घाला घातला आहे. कोंडी अथं झालेल्या भीषण अपघातात दीड वर्षाच्या चिमुकल्यासह दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. धावत्या ट्रकला भरधाव कारने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला आहे. या भीषण अपघातानंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंत पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते.



पुण्याच्या देहूरोड येथील रवी खंडागळे यांचे कुटुंब अक्कलकोटला दर्शनासाठी जात होते. या अपघातात सिंधू रवी खंडागळे (वय ४२), त्यांची बहीण नंदा भाऊराव हाताळकर (वय ४५) आणि दीड वर्षाचा रुद्राक्ष मोरे यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर रुद्राक्षचे वडील उमेश प्रकाश मोरे (वय ३२) आणि आई साक्षी मोरे हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सदर घटनेची नोंद सोलापूरच्या सिव्हिल पोलिसात झाली असून पोलिस अधिक तपास करत आहेत.

दैनिक
यश सिद्धि न्यूज


## संपादकीय....

### भाढेवाढीचा प्रस्ताव

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ करण्यात येणार नसल्याचे नुकतेच परिवहनमंत्र्यांनी स्पष्ट केले असले तरी आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगात सर्वत्र कच्च्या तेला-ची टंचाईचा प्रश्न भेडसावत आहे. यावर वरिष्ठ पातळीवरून शांततेच्या मार्गातून विचारविनिमय झाल्यास तोडगा निघेल. परंतु तशा हालचाली होताना दिसत नाहीत. याचा फटका विकसनशील देशांना बसत आहे. अशीच परिस्थिती पुढेही राहिल्यास अनेक देश गरीबीच्या खाईत व उपासमारी व म हागाईच्या गर्तेत पडल्याशिवाय राहणार नाही. दरम्यान भारत देशातील लोकसंख्येच्या तुलनेने हे परवडणारे नाही. अगोदरच सरकार आर्थिक बोजा सहन करीत आहे. दरम्यान राज्यात डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून, मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. त्यामुळे प्रति लिटर ३ रुपये १० पैशांची वाढ नोंदविण्यात आली आहे. या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत असून, मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी रुपये, तर वार्षिक स्तरावर सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार आहे. एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून, एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थिती-वर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते. तथापि, कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नसून, केंद्र आणि राज्य शासनाच्या म ार्गदर्शनाखाली इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल. एसटीने प्रवास करणाऱ्या सर्वसाम ान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी शासन विविध पर्यायांचा विचार करीत असून, इंधन बचत, ई-बसचा वाढता वापर, खर्च नियंत्रण तसेच महसूलवाढीच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत आहे. ग्रामीण भागा-तील नागरिकांसाठी एसटी ही अत्यावश्यक सार्वजनिक वाह-तूक सेवा असून, सेवा अबाधित राखत आर्थिक संतुलन कायम ठेवणे हे महामंडळासमोरील प्रमुख आव्हान आहे.

# धक्कादायक! नाशिकमध्ये घटसर्प रोगाच्या प्रादुर्भावाने दोन चिमुकल्यांचा मृत्यू; आरोग्य यंत्रणा हादरली, नागरिकांमध्ये भीती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : गेल्या काही महिन्यात वेगवेगळ्या गुन्हेगारीच्या घटनांचं केंद्रबिंदु बनलेल्या नाशिक जिल्ह्या-तून आता आरोग्यविषयक धक्कादायक बातमी समोर आली आहे. मालेगावात दोन चिमुकल्यांचा घटसर्प आजाराने मृत्यू झाल्याने आरोग्य यंत्रणा हादरली असून मालेगाव शहरात भीतीचे वाता-वरण निर्माण झाले आहे. घटसर्प आजार कालबाह्य झाल्याचा दावा शासनाकडून करण्यात येतो. मात्र, दोघ लहान म ुलांच्या मृत्युने मोठे प्रश्नचिन्ह उभारले असून वेगवेगळ्या लसीकरणानंतरही मृत्यूची घटना घडल्याने आरोग्य व्यवस्थेच्या कारभारवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मालेगावात शहरातील दोन लहान बाळांचा घटसर्प या गंभीर आजाराने मृत्यू झाल्याने संपूर्ण आरोग्य यंत्रणा हादरून गेली आहे. एकीकडे सरकार घटसर्प हा आजार जवळपास संपल्याचा दावा शासनाकडून केला जात आहे. तसेच, दुसरीकडे लसीकरणावरही म ोठा खर्च होत असतांना दोन निष्पाप बालकांचा मृत्यू होतो, ही बाब अत्यंत गंभीर मानली जात असून आरोग्य यंत्रणांवर मात्र प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. गेल्या अनेक वर्षापासून मालेगा-वात वास्तव्यास असलेल्या राजस्थानी कुटुंबातील ही दोन बालके असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, या घटनेमुळे मालेगाव शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर आता मोठे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, मालेगावात आरोग्याचे प्रश्न नेहमीच गंभीर स्वरूपाचे पाहायला मिळतात. कधी काळी कोरोनाचे हॉटस्पॉट मालेगाव बनलेले होते तर टायफाईड, डेंग्यू, मलेरिया, डायरिया आदी आजार तर नित्याचेच झालेले आहेत. त्यामुळे, महापालिका प्रशासन व आरोग्य यंत्रणांनी घटसर्प रोगाने बाधित दोन चिमुकल्यांचा मृत्यू गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

काय आहे घटसर्प रोग?

पावसाळ्याच्या तोंडावर घटसर्प ह्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव हा जनावरांमध्ये आढळून येतो. त्यालाच हेमोरॅजिक सेप्टिसिमिया नावाचा एक धोकादायक आजार असेही म्हणतात. त्यावर वेळीच उपाय झाला नाही तर जनावरे दगावण्याचाही धोका असतो. त्यामुळे वेळीच लसीकणर करुन घेणे हाच यामधील सर्वोत्तम पर्याय आहे. याचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी सध्या गावोगावी लसीकरण मोहिम सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कसलाही विलंब न करता लसीकरण करुन घेणे गरजेचे आहे. विशेषत: गाई आणि म्हशीम ध्येच याची लक्षणे आढळतात. शिवाय हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा फैलावही लवकर होतो. हा आजार मे-जूनमध्ये होतो.हा एक जिवाणूजन्य रोग आहे. त्यामुळे त्याच्याविषयी माहिती असून उपचार पध्दती जाणून घेणे तेवढेच महत्वाचे आहे. दरम्यान, त्याम ुळेच प्राण्यांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

# शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आवश्यक : जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : समाजकल्याण विभागाच्या विविध योजना अनुसूचित जाती-जमातीतील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक असून, त्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असे प्रतिपादन धाराशिवचे जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी केले.

प्रबुद्ध रंगभूमी बहुउद्देशीय संस्था, कळंब यांच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता तथागत बुद्ध विहार, समता नगर, पु. सावरगाव, कळंब येथे आयोजित अनुसूचित जाती जम ाती शासकीय योजना - २०२६ माहितीपत्रक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त उपप्राचार्य डॉ. शंकर कांबळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्ष लखन गायकवाड आणि माजी नगरसेवक सुनिल गायकवाड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात तथ-ागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, त्रिशरण-पंचशील ग्रहणाने झाली.

प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष सुभाष घोडके यांनी सांगितले की, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सम ाजकल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती असलेली दिनदर्शिका, घडीपत्रिका आणि दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्याची पुस्तिका सम ाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे काम संस्था करत आहे.



डॉ. शंकर कांबळे यांनी शासनाच्या योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवणारे विवेक खडसे हे पहिले अधिकारी असल्याचे सांगून संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. माजी नगरसेवक सुनिल गायकवाड यांनीही योजना तळागाळापर्यंतपोहोचवण्यासाठी संस्थेसोबत कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमात लक्ष्मण शिंदे, बंडू ताटे यांच्यासह पत्रकार शीतल वाघमारे, भास्कर सोनवणे, रंगनाथ वाघमारे, महादेव टोपे, भारत ओव्हाळ, माधवसिंग राजपूत आणि अनेक सामाजिक कार्यकर्ते, सेवानिवृत्त अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. अविनाश घोडके यांनी केले, तर आभार प्रदर्शन बंडू आबा ताटे यांनी मानले.

# पंढरपूर विभागाचे कर्तव्यदक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब यांचा सत्कार









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी पंढरपूर विभागाचे उपविभागीय पो-लीस अधिकारी श्री प्रशांत डगळे यांचा शाल, पुष्पहार, व श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्ती, देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला, यावेळी श्री प्रदीप भोसले ओबीसी सेल जिल्हा उपाध्यक्ष(शिंदे शिवसेना गट), श्री राजेंद्र कोरके पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, व ज्येष्ठ श्री रमेश जी पवार, श्री राज जाधव, श्री मयूर माळी, श्री पृथ्वी भोसले उपस्थित होते, तसेच नुकत्याच दहावी परीक्षेचा निकाल लागला याम ध्ये गौरवित यश मिळवून प्रथम दुतीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंतांचा ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप भोसले यांच्या हस्ते त्यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला आहे. त्याचबरोबर त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमही राबवलेले आहेत. व त्यांना समाजकार्याची आवड असल्यामुळे त्यांनी अनेक समाज उपयोगी कार्यक्रम त्यांच्या या कार्यकाळामध्ये राबवलेले आहेत.




# स्वेरी फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय परिषदेत घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी मधील विद्यार्थ्यांनी भिगवण (जि. पुणे) येथील दत्तकला शिक्षण संस्थेत दि. २६ व २७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उत्कृष्ट संशोधन प्रकल्पांमुळे स्वेरीच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून विद्यार्थ्यांच्या विशेष कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वेरीचे संस्थापक डॉ.बी. पी.रोंगे यांच्या प्रेरणेने व प्राचार्य डॉ.मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर सखोल अभ्यास करून आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधन प्रकल्प सादर केले. स्वेरी या संस्थेच्या नावा-तच 'रिसर्च' हा शब्द असल्याने सुरुवातीपासूनच संशोधनाला प्राधान्य दिले जाते. आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन, नाविन्यपूर्ण कल्पना आणि प्रभावी मांडणी यांच्या जोरावर विद्यार्थ्यांनी परीक्षक व उपस्थित मान्यवरांना प्रभावित केले. यामध्ये ओरल प्रेझेंटेशन' स्पर्धेत सृष्टी शांतिलाल झाडे व समृद्धी अनिल सुरवसे यांनी उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांकाचे प्रत्येकी रोख रु. ३ हजाराचे पारितोषिक मिळविले. पोस्टर प्रेझेंटेशन' स्पर्धेत शितल प्रकाश ऐवळे व प्रतिक्षा अर्जुन गवळी यांनी प्रथम क्रमांकाचे प्रत्येकी रु. ३ हजारांचे रोख पारितोषिक मिळविले. तसेच ओरल प्रेझेंटेशन' स्पर्धेत स्वप्नाली धनाजी घाडगे व प्राजक्ता संतोष शिंदे यांनी तृतीय क्रमांक मि ळवत उत्कृष्ट सादरीकरणासाठी असलेल्या प्रत्येकी रु.१५०० चे रोख पारितोषिक मिळविले. या परिषदेत स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीमधील तब्बल ५४ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. संशोधन विषयावर विद्यार्थ्यांनी मेहनत घेत प्रभावीपणे सादरीकरण केल्याम ुळे स्वेरीत रुजविलेल्या संशोधन संस्कृतीची ताकद त्याठिकाणी अधोरेखित झाली तसेच स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी मधील फार्मासुटीक्स या विभागामधील विद्यार्थी सुयश मालोजी भोस-ले यांनी इंटरनॅशनल समिट ऑन फ्युचर- रेडी फार्मसी, इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट सायन्स' या आंतरराष्ट्रीय परिषदेत यशस्वी सहभाग नोंदविला. वालचंदनगर (ता. इंदापूर, जि. पुणे) मध्ये फडतरे नॉलेज सिटी क्लब यांच्या तर्फे दि. ६ व दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजिलेल्या या परिषदेत म हाविद्यालयातीलच विद्यार्थी दुर्वे श शंकर बुरसे यांनी फार्म्युलेशन अँड इव्हाल्युशन ऑफ लिक्विड बेस्ड ड्राय डिलिव्हरी सिस्टीम' या विषयवार आयोजिलेल्या संशोधन स्पर्धेत द्वितीय क्रम ांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या सर्व यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. हेमंत बनसोडे व इतर शिक्षकवृंद यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे स्वे-रीज कॉलेज ऑफ फार्मसीच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रा-तील उत्कृष्टतेचा ठसा अधिक ठळक झाला असून भविष्यातही विद्यार्थी संशोधन क्षेत्रात नवे म ानदंड प्रस्थापित करतील असा विश्वास पंढरपूर पंचक्रोशीत व्यक्त करण्यात येत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस.व्ही.मांडवे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शिक्षक आढावा बैठकीत समस्यांचा पाऊस!

## २१ मे रोजी शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या सोबत बैठक; प्रश्न न सुटल्यास २५ मे पासून पुण्यात सत्यजीत तांबे यांचे आमरण उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी नाशिक : नाशिक विभागाचे पदवीधर आमदार सत्यजीत तांबे यांनी नुकतीच नाशिक येथे विभागातील सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकीत नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर येथून मोठ्या संख्येने पदाधिकारी हजर होते. बैठकी दरम्यान उपस्थित शिक्षकांनी आणि पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभारावर तीव्र संताप व्यक्त करत समस्यांचा पाऊस पाडला.

बदल्या, पेन्डिंग फाईल्स आणि दलालीचा सुळसुळाट बैठकीतील मुख्य मुद्दे या बैठकीत शिक्षण उपसंचालक कार्यालय आणि शिक्षणाधिकारी कार्यालयातील रखडलेल्या कारभाराचे वाभाडे काढण्यात आले. पदाधिकाऱ्यांनी मांडलेल्या प्रमुख समस्या खालीलप्रमाणे:

चुकीची संच मान्यता व चुकीचे समायोजन: संच मान्यतेतील दुरुस्ती आणि शिक्षकांचे समायोजन या प्रक्रियेत मोठ्या त्रुटी असल्याचा आरोप करण्यात आला.

प्रलंबित देयके आणि मंजुरी: अनुकंपा तत्त्वावरील मंजुरी, फरक बिले (Differentials), आणि मेडिकल बिले मंजुरीसाठी स्वतंत्र 'टॅब' उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

अशैक्षणिक कामांचा बोजा: शिक्षकांना सातत्याने अशैक्षणिक कामे दिली जात आहेत. जर एखाद्या शिक्षकाकडे BLO (मतदार नोंदणी अधिकारी) चे काम असेल, तर त्याला पुन्हा जनगणनेचे काम देऊ नये, अशी आग्रही मागणी करण्यात आली.

अधिकाऱ्यांची मनमानी आणि कार्यालयात विनाकारण येणाऱ्यांची दलाली:

■ शिक्षण आयुक्तांनी प्रत्येक फाईलसाठी १० कागदपत्रे मागितली असताना, नाशिकचे कार्यालय ३० पेक्षा जास्त कागदपत्रांची मागणी करून जाणीवपूर्वक अडवणूक करत आहे. कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा अभ्यास नसल्यामुळे फाईल तपासणीसाठी बाहेरून 'तज्ज्ञ' आयात केले जातात आणि त्यांच्या माध्यमातून दलाली चालते, असा गंभीर आरोप बैठकीत करण्यात आला.

■ पवित्र पोर्टल व रोस्टर तपासणीत अडवणूक : पवित्र पोर्टलची मुदत ३० मे रोजी संपत आली असतानाही, उपसंचालक रोस्टर तपासणीच्या फाईलवर स्वाक्षरी करत नाहीत. रोस्टर तपासणीसाठी संस्था प्रतिनिधींना वारंवार हेलपाटे मारावे लागत असून दररोज नवीन कागदपत्रांची मागणी केली जात आहे.

■ सेवानिवृत्तांची हेळसांड : सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रस्ताव आणि त्यांच्या हक्काच्या लाभ योजनांचे विषय कार्यालयात धूळ खात पडून आहेत.

शिक्षण उपसंचालकांची मान-सन्मानाने बदली करा!

कार्यालयातील या सर्व जाचाला कंटाळून, विभागीय शिक्षण उपसंचालकांची आता मान-सन्मानाने येथून बदली करून द्यावी, अशी संतप्त मागणी उपस्थित संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार तांबे यांच्याकडे केली.

**आक्रमक पाऊल:**

२१ में च्या बैठकीत प्रश्न नसुटल्यास २५ मे पासून पुण्यात आमरण उपोषण

शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या या सर्व व्यथा ऐकून घेतल्यानंतर आमदार सत्यजीत तांबे यांनी सर्व समस्यांची सविस्तर नोंद घेतली. या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी २१ मे २०२६ रोजी शिक्षण आयुक्तांसोबत आमदार तांबे यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत जर सकारात्मक निर्णय होऊन समस्या त्वरित सुटल्या नाहीत, तर थेट शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर उपोषण व आंदोलन छेडण्याचा इशारा तांबे यांनी दिला आहे. २५ मे २०२६ पासून आमदार सत्यजीत तांबे स्वतः पुणे येथे शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रतापसिंह यांच्या कार्यालयासमोर 'आमरण उपोषणास' बसणार आहेत.



प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीला महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे सचिव एस. बी. देशमुख यांच्यासह शिवाजी निरगुडे, प्रदीप सांगळे, रवी मोरे, अरुण पवार, संजय पवार, दीपक गायकवाड, एन. डी. नांद्रे, आप्पासाहेब शिंदे, मोहन चकोर, विजय बडे निलेश ठाकुर गोरख कुणगर ,आणि बाळासाहेब ढोबळे यांच्यासह नाशिक विभागातील शेकडो शिक्षक व संस्था प्रतिनिधी उपस्थित होते. या बाबत आता २१ मे रोजी होणाऱ्या बैठकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

---

# पंढरपुर शहरात जनगणनेच्या दुसऱ्या भागाला सुरुवात :मुख्याधिकारी महेश रोकडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरात जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात नागरिकांना डिजिटल जनगणना करण्यासाठी ०१ ते १५ मे दरम्यान मुदत दिली होती. यातील पहिल्या टप्प्यातील दुसऱ्या भागाला शनिवार (ता.१६) पासून सुरवात झाली आहे. यात प्रगणक प्रत्येक घरी जाऊन घरयादी व घरगणनेचे काम करणार आहेत. स्वगणना केली नसल्यास तरी देखील घरगणनेचे काम प्रगणक करतील. यासाठी नागरीकांनी आलेल्या प्रगणकांना अचूक माहिती द्यावी. असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

दिनांक १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीतील दुसऱ्या टप्प्याच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात झालेली असून, जनगणना संचालनालय सह संचालक रमेश भोसले यांनी प्रत्यक्ष भेट देवुन बोहरी पेट्रोल पंप येथील भागातील सुरु असलेल्या कामाची माहिती घेतली व त्या भागाचे प्रगणक, पर्यवेक्षक यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांचे समवेत जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथील जनगणना अधिकारी, उपस्थित होते. पंढरपूर शहरात जनगणनेचे प्रत्यक्ष कामकाज करण्याकरिता २५ पर्यवेक्षक व १५० प्रगणकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जनगणनेसाठी नागरीकांनी प्रगणकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

**जनगणनेसाठी २५ पर्यवेक्षक व १५० प्रगणकांची नियुक्ती**

---

# जलवाहिनीच्या कामामुळे होणाऱ्या गैरसोयीबाबत नागरिकांच्या तक्रारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : घाटकोपर पश्चिम असल्फा पाईपलाईन परिसरात सध्या ६० इंच व्यासाच्या मुख्य जलवाहिनीचे नव्याने काम सुरू असून ही संपूर्ण जलवाहिनी भूमिगत स्वरूपात टाकण्यात येत आहे. मूळ जलवाहिनी अत्यंत जुनी झाली असून सध्या महापालिकेकडून नव्याने ही जलवाहिनी टाकण्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. मात्र या कामामुळे स्थानिक नागरिकांना काही समस्या उद्भवल्याने स्थानिक नगरसेवक किरण लांडगे यांच्या कडे याबाबत तक्रार करण्यात आली होती.सदरच्या सुरु असलेल्या भूमिगत जलवाहिनीच्या कामामुळे स्थानिक लोकांना पाणी कनेक्शन देण्यात आले असून येणाऱ्या पावसाळ्यात ते टिकण्याबाबत शंका उपस्थित केली आहे. तसेच या भागात असलेल्या मुख्य नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पावसाळ्यापूर्वी तो साफ करण्यात यावा अन्यथा या भागातील गटारे तुंबून मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे भूमिगत जलवाहिनीच्या कामानंतर या ठिकाणी तयार करण्यात येणाऱ्या रोडचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावे जेणेकरून स्थानिकांना चिखल माती आणि खड्ड्यांचा त्रास होणार नाही.या बाबत स्थानिक नगरसेवक किरण लांडगे यांनी आज महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्याबरोबर प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या समस्या समजावून सांगितल्या व त्यावर ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली.



---

# माजी आमदार प्रशांत परिचारक पुन्हा स्थानिक स्वराज्य विधान परिषद निवडणूक लढवणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका १८ जून रोजी होणार असून. माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी निवडणूक लढवण्याची तयारी केल्याची दिसून येत आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये भाजपची ताकद मोठी आहे त्यामुळे जिल्ह्यामध्ये भाजपचा उमेदवार निवडून येणार निश्चित झाले आहे.



सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक इच्छुक आहेत पण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, कोणता उमेदवार देणार याकडे लक्ष लागले आहे. परिचारक यांनी निवडणूक लढवण्याची तयारी केली होती तेव्हा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, व चंद्रशेखर बावनकुळे, यांनी परिचारक यांना विधान परिषदेवर संधी देण्यात येईल असेही आश्वासन दिले होते. मात्र विधान परिषदेच्या दोन वेळा निवडणुका झाल्या त्यामध्ये परिचारक यांना संधी देण्यात आली नाही. त्यामुळे परिचारक गटात नाराजी निर्माण झाली होती. पुन्हा १८ जून रोजी विधान परिषदेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी परिचारक यांनी निवडणूक लढवण्याची तयारी केल्याची दिसून येत आहे.

---

# महिना उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून सक्षम करून ग्रामीण व शहरी भागात श्रम रोजगार निर्मिती त्यांना देण्यासाठी विशेष योजना राबवावी: अंबिका पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टी महिला आघाडीचे अध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्य असो अंबिका पाटील यांनी मा गडकरी यांना निवेदन सादर करून महिलांसाठी उद्योग प्रशिक्षण आर्थिक सहाय्य व बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासंदर्भात विविध मागण्या मांडल्या.

निवेदनामध्ये प्रत्येक जिल्ह्यात महिला उद्योजकता प्रशिक्षण केंद्र सुरू करणे, महिला बचत गट व नव उद्योजक महिलांसाठी सुलभ कर्ज योजना उपलब्ध करणे, राष्ट्रीय महामार्ग परिसरातील फूड प्लाझा, कॅफे व स्थानिक उत्पादन विक्री केंद्रामध्ये महिला बचत गटांना प्राधान्य देणे, ग्रामीण भागात महिला उद्योग क्लस्टर उभारणी तसेच महिला उत्पादनासाठी ऑनलाईन विक्री सुविधा उपलब्ध करून देणे अशा प्रमुख मागण्याकरता आले आहेत याशिवाय कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना रोजगार उद्योग सुरू करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम केल्या देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगार निर्माण होईल, मा. नितीन गडकरी यांनी निवेदनाची दखल घेत सकारात्मक विचार करण्याची आश्वासन देण्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्यावेळी आमदार सुभाष बापू देशमुख, शहराध्यक्ष रोहि तळवळकर, उपमापर ज्ञानेश्वर देवकर, सुधा अळ्ळी मोरे, दक्षिण सोलापूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**केंद्रीय रस्ते वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री मा श्री नितीन गडकरी यांना निवेदन**

---

**घोळसगाव येथील कार्यक्रमात उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांचे आश्वासन**

# घोळसगाव येथे आमदार निधीतून पायाभूत सुविधांना प्राधान्य देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : सर्व धर्मीय जागृत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान घोळसगाव येथे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने भाविक भक्ताना अनेक अडचणीतून मार्ग काडावे लागते. येत्या शनी अमावास्या यात्रे पर्यंत घोळसगाव ते बोळेगाव शिव पर्यंत आणि घोळसगाव ते किरनल्ली रस्त्या पासून श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यंत पक्का मजबुत रस्ता तसेच आमदार निधीतून येथे सभागृहांचे बांधकाम करण्याचे आश्वासन उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांनी दिली.

जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांचे शुभ हस्ते गुणवंत विद्यार्थांचा आणि अक्कलकोट, तुळजापूर आणि उमरगा तालुक्यातील सर्व राजकीय पक्षाचे नूतन जि.प.व प.स. सदस्यांचा सन्मान करण्यात आले.या प्रसंगी उपसभापती सागर कल्याणशेट्टी बोलत होते.

प्रथम उपस्थित नागरीकाकडून राष्ट्रगीत म्हणून संविधानाची शपथ घेऊन कार्यक्रमास सुरवात करण्यात आले. यावेळी कलबुर्गीचे उद्योगपती शहाजीराव पाटील,जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय वक्ता अँड वैजनाथ झळकी, समितीचे आळंद तालुका अध्यक्ष मंजुनाथ बिराजदार,नळदुर्ग नगराध्यक्ष बसवराज अप्पा धरणे, सोलापूर जि.प.माजी पक्ष नेता आनंद तानवडे,सिंदगाव सरपंच मेलगीरी,अमोल हिप्परगी यांच्या प्रमुख उपस्थित राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांचे शुभ हस्ते अक्कलकोट पंचायत समिती सभापती रश्मी हिप्परगी,उपसभापती सागर कल्याणशेट्टी, तुळजापुर पं.स. उपसभापती रोहिणी मेलगीरी, वागदरी जि.प. सदस्य प्रविण तानवडे,जेऊर जि.प.सदस्य विकास बुळ्ळा, नागणसूर जि. प. सदस्य सिध्दाराम शिवमुर्ती, बोरामणी जि.प. सदस्य नेताजी खंडागळे इत्यादी तसेच अक्कलकोट तालुक्यातील दहिटणे प.स.सदस्या आशाताई इंगळे,जेऊर प.स. सदस्या विमलताई गव्हाणे, कुरनुर प.स. सदस्य विनोद मोरे, वागदरी प.स. सदस्य अप्पासाहेब किवडे,शिरवळ प.स. सदस्य गणेश मोरे, नागणसूर प.स. सदस्य वैष्णवी सलगरे,उमरगा तालुक्यातील पं.स.सदस्य अमर वाले,पं.स.सदस्या अलका सुलतानपुर आदी पं.स.व जि.प. सदस्यचा सन्मान करण्यात आला. यावेळी अक्कलकोट तालुक्यातील सर्व पंचायत समिती सदस्य आणि जिल्हा परिषद सदस्य यांच्या स्थानिक निधीतून येथील विविध विकास कामे करून देण्या बाबत आमचा प्रयत्न सुरु असल्याची पं.स.सदस्य विनोद मोरे यावेळी सांगितले

पैसे घेऊन मतदाना केल्यास देश विकल्यासारखे होईल म्हणून मतदान करताना कोणीही पैसे घेऊ नका असे कु.साक्षी व कु. प्रीती या लहान मुलीने गायिलेले देशभक्ती गीतास तसेच कर्नाटकातील सुप्रसिद्ध पारीजात भजना गायिका प्रभावती किरणगी यांच्या अध्यात्मिक आणि देशभक्ती गायनास श्रोत्यांनी प्रचंड प्रतिसाद दिले. बोलो भारत माता की जय, वंदे मातरम्, श्री शनैश्वर मल्लिनाथ महाराज की जय चा जयघोष करीत हजारो भाविक भक्तांनी श्री शनैश्वर आणि राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दर्शनासाठी भाविक भक्तानी अलोट गर्दी केली होती. दर्शनासाठी आलेल्या सुमारे दहा हजारांहून अधिक



भाविक भक्तांनी महाप्रसादाचा व श्रीचे दर्शन घेऊन जल्लोष साजरा केले.

श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान पंच कमिटी अध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्य अप्पासाहेब किवडे यांनी प्रस्तावना केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार बसवराज बिराजदार, सरपंच राजशेखर किवडे, पंडित बादोले मास्तर,कमलाकर सुतार, प्रशांत बनजगोळे, मल्लाप्पा मंगरूळ, कुंभार परिवार, कल्लाप्पा गोगावे, इरसिंगपा पडसलगे, डॉ. सिद्राम कलशेट्टी, सुरेश त्रिगुळे, बलभीम पांढरे, वसंत रेड्डी, नागेश ढगे, विरपक्ष उमाटे, लक्ष्मणआलुरे, सचिन किवडे, उमेश साळुंखे, हसन रेवूरे, रेवनप्पा किवडे, अशोक वर्दे, विश्वनाथ पाटील, गणेश पाटील, दिलीप पाटील, आदींनी परिश्रम घेतले. वैजनाथ वर्दे यांनी सूत्रसंचालन केले. आभार सचिव राजेंद्र काळे यांनी मानले.

# शासकीय आश्रम शाळा बोपेगाव येथे ११ वी, १२ वी विज्ञान शाखेचा 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात संपन्न

## ग्रामीण भागातील विद्यार्थी बनणार डॉक्टर-इंजिनिअर; JEE आणि NEET चे मिळणार मोफत व दर्जेदार मार्गदर्शन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत इयत्ता अकरावी आणि बारावीच्या विज्ञान शाखेच्या (JEE NEET विशेष बॅच) विद्यार्थ्यांचा 'शाळा प्रवेशोत्सव' सोहळा अत्यंत उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करून त्यांना भावी यशासाठी प्रोत्साहित करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना गावातच दर्जेदार शिक्षण व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या विशेष तुकडीबद्दल पालकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

**मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि विद्यार्थ्यांचे स्वागत**

कार्यक्रमाची सुरुवात सहाय्यक प्रकल्प अधिकारी हर्षवर्धन नाईक, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुनील नेरकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी निम्मा कापडणीस, गोवर्धन पवार, विस्तार अधिकारी संदीप चंदनशिवे, बोपेगावचे सरपंच वसंतराव कावळे, मुंडेगावचे मुख्याध्यापक जहागीरदार सर, बिलमाळचे मुख्याध्यापक गायकवाड सर आणि बोपेगावचे मुख्याध्यापक महेंद्र कोतकर विकास सोनवणे यांच्या यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. शाळेच्या वतीने नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प आणि शैक्षणिक साहित्य देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले.

> **आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण न देता, त्यांना गएए आणि छएएढ यांसारख्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांची उत्तम तयारी याच ठिकाणी करून घेतली जाणार आहे. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थी डॉक्टर आणि इंजिनिअर व्हावेत, हेच या उपक्रमाचे ध्येय आहे.**
>
> **– हर्षवर्धन नाईक (सहाय्यक प्रकल्प अधिकारी)**

**पालकांकडून प्रशासनाचे आभार**

या सोहळ्याला स्थानिक लोकप्रतिनिधी, शिक्षण विभागाचे अधिकारी, परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक आणि मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. बोपेगावचे सरपंच वसंतराव कावळे यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम घेण्याचे आवाहन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आपल्या मुलांना गावातच अशा उच्च दर्जाच्या स्पर्धा परीक्षांचे मोफत मार्गदर्शन मिळणार असल्याबद्दल पालकांनी प्रशासनाचे विशेष आभार मानले.

**शिक्षकांचे परिश्रम आणि यशस्वी नियोजन**

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक महेंद्र कोतकर कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक विकास सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली: उपशिक्षक: जगन्नाथ रंधवे, गोरखनाथ देशमुख, विजेंद्र पाटील, सुनील भागवत, झाम्बरू चौधरी. उपशिक्षिका: सुलभा अहिरे, प्रतीक्षा पवार, जयमाला भामरे, आशा डोखे, सीताबाई हडस. क्रीडा शिक्षक: विलास गायकवाड आणि शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन उपशिक्षिका सुलभा अहिरे यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि शिक्षकांचा उत्साह पाहता, यंदाचे शैक्षणिक वर्ष बोपेगाव आश्रम शाळेसाठी निश्चितच ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पंढरपूर तालुक्यात डिजिटल घरगणनेला प्रारंभ; अचुक माहिती देऊन सहकार्य करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारताच्या आगामी २०२% च्या जनगणनेचा पहिला टप्पा असलेला 'घर यादी व घरगणना' कार्यक्रम १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबविली जाणार असून, नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

जनगणनेचे प्रत्यक्ष कामकाज करणेकरीता तालुक्यात ८५ पर्यवेक्षक व ५५८ प्रगणकांची नियुक्ती करणेत आलेली आहे या मोहिमेच्या माध्यमातून प्रत्येक घराची पाहणी आणि प्रत्येक व्यक्तीची नोंदणी केली जात आहे. नागरिकांकडून मिळणारी माहिती पूर्णपणे सुरक्षित व गोपनीय ठेवली जाईल, 'अचूक जनगणना-सक्षम भारताची पायाभरणी' हे ब्रीद घेऊन ही मोहीम राबवली जात आहे.

जनगणना संचालनालय सह संचालक रमेश भोसले यांनी वाखरी येथे प्रत्यक्ष कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत जनगणना सांख्यिकी अधिकारी अजित भांड, सहाय्यक महसूल अधिकारी प्रवीण पवार, महसूल सहाय्यक सागर चंदनशिवे उपस्थित होते.

## तहसिलदार सचिन लंगुटे यांचे आवाहन

जनगणना २०२% साठी एप्रिल २०२६ पासून घरगणनेचा पहिला टप्पा सुरू झाला आहे. या टप्प्यात प्रत्येक घर, झोपडी, फ्लॅटला युनिक घर क्रमांक दिला जाईल. मौजे वाखरी येथून कामास सुरुवात केली असल्याचे यावेळी सह संचालक रमेश भोसले यांनी सांगितले. घर क्रमांक देताना एकही घर सुटता कामा नये. २०२% ची जनगणना अचूक होण्यासाठी घरगणना हा पाया आहे. असे सांख्यिकी अधिकारी अजित भांड यांनी प्रगणक व पर्यवेक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले.

जनगणनेसाठी नागरीकांनी प्रगणकांना आवश्यक व अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.






# एसबीआय भिवंडी शाखेच्या तत्परतेमुळे विधवा महिलेला विमा निधीचा दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पतीच्या आकस्मिक निधनानंतर आर्थिक व मानसिक संकटात सापडलेल्या एका विधवा महिलेला स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) भिवंडी शाखेच्या तत्पर सेवेमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (झचगगइध) आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (झचड-इध) अंतर्गत मिळणारी विमा दावा रक्कम वेळेत मंजूर करून संबंधित महिलेच्या खात्यात जमा करण्यात आल्याने बँकेच्या संवेदनशील कार्यपद्धतीचे कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कै. अंकुश म्हात्रे यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती संगीता अंकुश म्हात्रे या मोठ्या संकटात सापडल्या होत्या. आर्थिक आधार हरपल्याने त्या चिंतेत असताना त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, भिवंडी शाखेशी संपर्क साधला. त्यानंतर शाखेचे मुख्य व्यवस्थापक पवन सिंग निगम आणि उपशाखा व्यवस्थापक मनिषा अंशुमन घोलप यांनी तत्परतेने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेत दोन्ही विमा योजनांचे दावे दाखल केले.

## प्रधानमंत्री जीवन ज्योती व सुरक्षा विमा योजनेंतर्गत दावा रक्कम खात्यात जमा; दु:खाच्या काळात बँकेने दिला आधार

बँकेच्या जलद आणि सहकार्यपूर्ण भूमिकेमुळे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना या दोन्ही योजनांअंतर्गत मिळणारी एकूण दावा रक्कम वारसदार संगीता म्हात्रे यांच्या खात्यात जमा करण्यात आली. त्यामुळे संकटाच्या काळात त्यांना मोठा आर्थिक आधार मिळाला आहे.

यावेळी संगीता अंकुश म्हात्रे यांनी एसबीआय भिवंडी शाखेचे मुख्य व्यवस्थापक पवन सिंग निगम तसेच उपशाखा व्यवस्थापक मनिषा अंशुमन घोलप यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले. दु:खाच्या काळात बँकेने केवळ औपचारिकता न ठेवता माणुसकीची भूमिका घेतली. त्यांच्या सहकार्यामुळे मला मोठा आधार मिळाला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

सामान्य नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासनाच्या विमा योजनांचा योग्य लाभ गरजूंपर्यंत पोहोचविण्यात बँकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, याचे उदाहरण या घटनेतून पुन्हा एकदा समोर आले आहे.

**प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आगामी काळात प्राधान्याने प्रयत्न करणार**

**मोठ्या संख्येने भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती**

# राष्ट्रवादीला भाजपचा धक्का; माण-खटाव मधील अनेक पदाधिकाऱ्यांचा जाहीर पक्ष प्रवेश







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मान-खटाव विधानसभा मतदारसंघातील गणेशवाडी वडूज पिंपळवाडी आणि कारभार वाडी तालुका खटाव येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. बोराटेवाडी तालुका माण येथील निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

यावेळी मंत्री जयकुमार गोरे यांनी पक्षप्रवेश केलेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे स्वागत करताना भारतीय जनता पक्षावर दाखवलेले विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही गावातील व परिसरातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आगामी काळात प्राधान्याने प्रयत्न करणार करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

तसेच राष्ट्रीय विचारधारा अधिक बळकट करून खटाव तालुका, व सातारा जिल्हा आणि महाराष्ट्र विकास दृष्टीने अग्रेसर करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची आव्हाने केले. हा पक्षप्रवेश १६ सोनिया गोरे यांच्या उपस्थितीत पार पडला.

त्यावेळी माजी सरपंच व ग्राम पंचायत सदस्य सोसायटी संचालक आणि विविध गावातील अनेक पदाधिकाऱ्यांनी आपल्या समर्थकांसह भाज्यांमध्ये प्रवेश केला यामध्ये दौलतराव बरकडे विठ्ठल बरकडे अंकुशराव स्वाती शिंगाडे जनार्दन गलांडे नारायण गलांडे शिवाजी करमाळे मनोहर साळुंखे बाळकृष्ण बरकडे गंगाराम गलांडे धनाजी भिसे सचिन गलांडे लक्ष्मण नारवणकर नंदित नालाडे अमोल माने, प्रकाश गलांडे रणजीत करमाळे अशोक शिंगाडे आदीसह अनेकांचा प्रवेश होता.

यावेळी प्रवेशासाठी कुंडलिक राऊत सोमनाथ घाडगे रमेश गुरगुले वैभव गुरगुले अमर साळुंखे गोरख काळे दीपक कारंडे धनश्री राऊत आदींनी पुढाकार घेतला व या कार्यक्रमाला भाजपचे सातारा जिल्हा उपाध्यक्ष संजय शेठ शितोळे सरकार डॉक्टर विवेक देशमुख माजी नगराध्यक्ष सुनील गोडसे प्रदीप खोटे सुरज शितोळे सरकार अक्षय थोरवे यांच्यासह मोठ्या संख्येने भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.